# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ, नागपूर यांचे समोरील माहिती अधिकार अधिनियम-२००५ च्या कलम १८ अन्वये दाखल तक्रार

**क्रमांक-तक्रार-१४०/२०२५** दिनांक :- ०२ एप्रिल, २०२६

१. श्री. कैलास रामभाऊ गर्गेलवार, -- **तक्रारदार**
रा. महादेव मंदिराचे समोरासमोर,श्री. त्रिंबक स्वामी मंदिराजवळ,
विठ्ठल मंदिर वार्ड, चंद्रपूर-४४२४०२

२. जन माहिती अधिकारी तथा शहर अभियंता,
पाणी पुरवठा विभाग, चंद्रपूर शहर महानगरपालिका, चंद्रपूर --**जन माहिती अधिकारी**

३. प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त, --**प्रथम अपिलीय अधिकारी**
चंद्रपूर महानगरपालिका, चंद्रपूर, ता. जि. चंद्रपूर

तक्रारदार यांनी माहितीचा अधिकार अधिनियम-२००५ च्या कलम १८ नुसार आयोगास दिनांक २८.०३.२०२५ रोजी (प्राप्त दिनांक ०१.०४.२०२५) थेट तक्रार अर्ज सादर केला आहे. या तक्रार अर्जा मध्ये तक्रारदार यांनी " माहिती अधिकार अधिनियम, २००५ मधील नियम ३ नुसार माहिती मिळविण्याच्या अधिकारानुसार व कलम ६(१) नुसार विनंती अर्ज दाखल केला असता ३० दिवस पूर्ण होऊनही माहिती न मिळाल्याने जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांचेवर कलम २०(१) व २०(२) अन्वये दंडाची व शिस्तभंगाची कार्यवाही करुन भरपाई मिळण्याबाबत." असे कारण नमूद करुन थेट तक्रार अर्ज दाखल केला आहे.

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मध्ये जन माहिती अधिकारी यांच्या निर्णयाने व्यथित झालेल्या अर्जदारास दाद मागण्याकरिता खालीलप्रमाणे कार्यपध्दती विहीत करण्यात आली आहे.

माहितीचा अधिकार अधिनियम -२००५ च्या कलम १९ (१) अन्वये ज्या कोणत्याही व्यक्तीला कलम ७ चे पोटकलम (१) किंवा पोटकलम (३) चा खंड (क) यामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या वेळेत निर्णय प्राप्त झाला नसेल, किंवा यथस्थिती केंद्रीय जन माहिती अधिकारी किंवा राज्य जन माहिती अधिकारी यांच्या निर्णयाने जी व्यक्ती व्यथित झालेली असेल अशा कोणत्याही व्यक्तीला अशी मुदत संपल्यापासून किंवा असा निर्णय प्राप्त झाल्यापासून तीस दिवसांच्या आत प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणांमधील यथास्थिती केंद्रीय जन माहिती अधिकारी किंवा राज्य जन माहिती अधिकारी यांच्यापेक्षा वरिष्ठ दर्जाच्या अशा अधिकाऱ्याकडे अपील करता येईल.

माहितीचा अधिकार अधिनियम-२००५ च्या कलम १९(६) अन्वये पोटकलम (१) किंवा पोटकलम (२) अन्वये केलेले अपील, ते मिळाल्याच्या दिनांकापासून यथास्थिती तीस दिवसांच्या आत किंवा ते दाखल केल्याच्या दिनांकापासून एकूण पंचेचाळीस दिवसांपेक्षा अधिक होणार नाही अशा वाढविलेल्या कालावधीच्या आत, कारणे लेखी नमूद करुन, निकालात काढण्यात येईल.

माहितीचा अधिकार अधिनियम -२००५ च्या कलम १९(३) अन्वये पोटकलम (१) खालील निर्णया विरुध्दचे दुसरे अपील, ज्या दिनांकास निर्णय द्यायला हवा होता किंवा प्रत्यक्षात मिळाला होता त्या दिनांकापासून नव्वद दिवसांच्या आत, केंद्रीय माहिती आयोगाकडे किंवा राज्य माहिती आयोगाकडे दाखल करता येईल.

मा. सर्वोच्च न्यायालय यांनी Chief Information Commissioner -Vs- State of Manipur (AIR २०१२ SC ८६४), यामध्ये सिव्हिल अपील क्रमांक १०७८७-१०७८८/२०११ या याचिकेवर, दिनांक १२.१२.२०११ रोजी दिलेल्या आदेशामध्ये – The nature of the power under Section १८ is supervisory in character whereas the procedure under Section १९ is an appellate procedure and a person who is aggrieved by refusal in receiving the information which he has sought for can only seek redress in the manner provided in the stature, namely, by following the procedure under Section १९. This Court is, therefore, of the opinion that Section ७ read with Section १९ provides a complete statutory mechanism to a person who is aggrieved by refusal to receive information. Such person has to get the information by following the aforesaid statutory provisions." असे स्पष्ट केले आहे.

मा. सर्वोच्च न्यायालय यांनी दिलेले आदेश (Judgment) लक्षात घेता असे स्पष्ट होते की, केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ मधील तरतुदीनुसार केलेल्या तक्रारी ऐवजी कलम ६ अंतर्गत केलेल्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराने व्यथीत झाल्यास, कलम १९ (१) नुसार प्रथम अपील व कलम १९(१) वरील निर्णय मान्य नसेल तर कलम १९(३) अन्वये व्दितीय अपील दाखल करणे क्रमप्राप्त ठरते.

तसेच ज्या माहिती अर्जाच्या संदर्भात कलम १९ (३) अन्वये आयोगास व्दितीय अपील सादर करण्यात आले आहे व ज्या अपील प्रकरणी आयोगाने पारित केलेल्या आदेशाची अंमलबजावणी झाली नाही, अशा प्रकरणी तक्रारदार यांनी कलम १८ अंतर्गत तक्रार दाखल करणे अपेक्षित आहे.

तक्रारदार यांनी आयोगाकडे दाखल केलेल्या तक्रारीचे अवलोकन केले असता आयोगास असे निदर्शनास आले आहे की, तक्रारदार यांनी माहिती अधिकार अधिनियम-२००५ मधील कलम ६(१) अंतर्गत दिनांक ०३.१२.२०२४ रोजी संबंधित जन माहिती अधिकारी, पाणी पुरवठा विभाग, चंद्रपूर शहर महानगरपालिका, चंद्रपूर यांचेकडे माहितीचा अर्ज दाखल केले व त्यानंतर "माहिती मिळाली नाही" असे कारण नमूद करुन माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत कलम १९(१) अन्वये दिनांक ०९.०१.२०२५ रोजी प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त, महानगरपालिका चंद्रपूर यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. त्यावर प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त, चंद्रपूर शहर, महानगरपालिका, चंद्रपूर यांनी दिनांक ३१.०१.२०२५ रोजी सुनावणी घेवून "अर्जदारास फक्त पाणी पुरवठा विभागातील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ४(१)(ख) नुसार प्रसिध्द केलेली एक ते सतरा मुद्दयांवरील माहिती अपेक्षीत असल्याचे दिसून येते. अर्जाची पडताळणी केली असता अर्जदाराने जोडपत्र-अ दिनांक ०३.१२.२०२४ चा अर्ज जन माहिती अधिकारी, पाणी पुरवठा विभाग या नावाने केला असून सदर अर्जामध्ये फक्त पाणी पुरवठा विभागातील एक ते सतरा मुद्दयांवरील माहिती मागितल्याचे दिसून येत नाही. अर्जदाराचा अर्ज अपूर्ण असून, सुनावणी मधील चर्चेनुसार अर्जदारास फक्त पाणी पुरवठा विभागातील माहिती पाहीजे असल्यास नव्याने स्वतंत्र अर्ज करावा. अपील अर्ज खारीज करण्यात येत आहे. यास्तव अपील अर्ज निकाली काढण्यात येत आहे" असे नमूद करुन आदेश पारीत केले. तद्नंतर तक्रारदार यांनी "माहिती अधिकार अधिनियम, २००५ मधील नियम ३ नुसार माहिती मिळविण्याच्या अधिकारानुसार व कलम ६(१) नुसार विनंती अर्ज दाखल केला असता ३० दिवस पूर्ण होऊनही माहिती न मिळाल्याने जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांचेवर कलम २०(१) व २०(२) अन्वये दंडाची व शिस्तभंगाची कार्यवाही करुन भरपाई मिळण्याबाबत" असे कारण नमूद करुन आयोगाकडे कलम १८ (१) अन्वये थेट तक्रार अर्ज दाखल केला आहे. यावरुन असे दिसून येते की, त्यांनी कलम १९ (३) नुसार आयोगाकडे व्दितीय अपिल केलेले नाही. त्यामुळे तक्रारदार यांनी कलम १९ (३) अंतर्गत उपलब्ध असलेल्या संपूर्ण वैधानिक कार्यप्रणालीचा अवलंब न करता कलम १८ चा वापर केला आहे.

तक्रारदार यांची कलम १९(३) अंतर्गत कार्यप्रणालीचा अवलंब न करता अशा पध्दतीने तक्रार दाखल करण्याची कृती मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार विसंगत ठरते.

तथापि, तक्रारकर्ता यांच्या दिनांक २८.०३.२०२५ रोजीच्या तक्रार अर्जाच्या अनुषंगाने आयोगाने जन माहिती अधिकारी तथा पाणी पुरवठा विभाग, चंद्रपूर शहर महानगरपालिका, चंद्रपूर व प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त, चंद्रपूर शहर, महानगरपालिका, चंद्रपूर यांना पत्र क्र. रामाआ/त.क्र. १४०/२०२५/तक्रार शाखा/२०४३, दिनांक २९.०४.२०२५ अन्वये तक्रारदार यांच्या दिनांक ०३.१२.२०२४ रोजीच्या माहिती अर्जासंदर्भात केलेल्या कार्यवाहीचा अहवाल आयोगास सादर करण्याबाबत कळविण्यात आले होते. त्यानुषंगाने प्रथम अपिलीय अधिकारी तथ उपायुक्त, चंद्रपूर शहर महानगरपालिका, चंद्रपूर यांनी दिनांक १६.०६.२०२५ च्या पत्रान्वये (प्राप्त दिनांक २३.०६.२०२५) आयोगास अहवाल सादर करुन त्यामध्ये, " तक्रारदार, श्री. कैलास रामभाऊ गर्गेलवार यांनी दिनांक ०३.१२.२०२४ रोजी जोडपत्र-अ मध्ये (१) माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ४(१)(ख) एक ते सतरा मुद्दयांची मुद्देनुसार माहिती देण्यात यावी, अशी माहिती मागणी केली. त्यानुसार जन माहिती अधिकारी तथा शहर अभियंता, पाणी पुरवठा विभाग, चंद्रपूर शहर महानगरपालिका यांचे कार्यालयीन पत्रक्र. चंशमनपा/पापुवि/२०२५/१५५, दि. ०६.०१.२०२५ अन्वये माहिती पुरविण्यात आली. तक्रारदाराने जोडपत्र-ब मध्ये दि. ०९.०१.२०२५ रोजी दाखल केले. त्यानुसार प्रथम अपील क्र. ०२/२०२५ ची सुनावणी दिनांक ३१.०१.२०२५ रोजी घेण्यात आली. अर्जदाराने जोडपत्र-अ दिनांक ०३.१२.२०२४ चा अर्ज जन माहिती अधिकारी, पाणी पुरवठा विभाग या नावाने केला असून सदर अर्जामध्ये फक्त पाणी पुरवठा विभागातील एक ते सतरा मुद्दयांवरील माहिती मागितल्याचे दिसून येत नाही. अर्जदाराचा अर्ज अपूरा असल्याने फक्त पाणी पुरवठा विभागातील माहिती पाहिजे असल्यास नव्याने स्वतंत्र अर्ज करावा. अपील अर्ज खारीज करण्यात येत आहे, असा आदेश पारीत केला.

जन माहिती अधिकारी यांनी सदर प्रकरणात चंद्रपूर शहर महानगरपालिकेने प्रसिध्द केलेली एक ते सतरा मुद्दयांवरील माहिती पुरविली असल्याने अपील अर्ज खारीज करण्यात यावा, अशी विनंती आहे" असे नमुद केले आहे.

सबब, जन माहिती अधिकारी तथा शहर अभियंता, पाणी पुरवठा विभाग, चंद्रपूर शहर महानगरपालिका, चंद्रपूर यांनी तक्रारकर्ता यांना जोडपत्र-अ च्या अनुषंगाने दिनांक ०६.०१.२०२५ च्या पत्रान्वये माहिती पुरविली आहे.

वरील वस्तुस्थिती विचारात घेता मा. सर्वोच्च न्यायालय यांनी सिव्हिल अपील क्र. १०७८७-१०७८८/२०११ या याचिकेवर दिलेले आदेशानुसार व जन माहिती अधिकारी यांनी तक्रारकर्ता यांना माहिती अर्जानुसार माहिती प्रदान केली असल्याने तक्रारदार यांनी कलम १८ अंतर्गत केलेल्या तक्रार अर्जावर कार्यवाही करण्याची आवश्यकता नाही. या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

## आदेश

प्रस्तुत तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

(गजानन निमदेव)
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ नागपूर

ठिकाण : नागपूर
दिनांक: ०२.०४.२०२६

राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर विभाग ★नागपूर★

जा.क्र. 2E40 दि. 7 APR 2026

E:\SD \तक्रार शाखा\थेट तक्रारआदेश – गर्गेलवार